## प्रेसनोट

दिनांक—१७/१२/२०२५

| | | |
|---|---|---|
| १ | युनिटचे नांव | अॅन्टी करप्शन ब्युरो अकोला |
| २ | आरोपीचे नांव, हुद्दा, वर्ग व कार्यालयाचा पत्ता | शैलेंद्र तुळशीराम बगाटे, वय ४३ वर्ष, व्यवसाय — एजंन्ट, (खाजगी शिक्षक) रा. कैलास टेकडी, खदान अकोला |
| ३ | पडताळणी तारीख | दिनांक १७/१२/२०२५ |
| ४ | मागणी केलेली लाच रक्कम | ५,०००/— रूपये |
| ५ | स्विकारलेली लाच रक्कम | ३,०००/— रूपये (पहिला हप्ता) |
| ६ | घटनास्थळ | जिल्हा परीषद, कार्यालयासमोर अकोला |

प्रकरणाची थोडक्यात हकीकत अशा प्रकारे आहे की, यातील तक्रारदार यांनी दि. १३/०६/२०२५ रोजी आंतरजातीय विवाह केला असुन शासनाच्या आंतरजातीय विवाह प्रोत्साहनपर अनुदान योजनेअंतर्गत आंतरजातीय विवाह करणाऱ्या जोडप्याला ५०,०००/— रूपयांचे अर्थसहाय्य दिल्या जाते. त्यानुसार सदर अर्थसहाय्य मिळण्याकरीता तक्रारदाराने जिल्हा परीषद, अकोला येथील समाज कल्याण विभागात संपुर्ण कागदपत्रांसह रितसर दि. ०२/०९/२०२५ रोजी अर्ज दाखल केला होता. परंतु बराच कालावधी उलटून गेल्यावरही अर्थसहाय्याची रक्कम मिळाली नाही. याबाबत विचारपुस करण्यासाठी तक्रारदार हे जिल्हा परीषद, अकोला येथील समाज कल्याण विभागात विचारपुस करण्यास गेले असता कार्यालयात उपस्थित असलेले शैलेंद्र बगाटे यांनी सदरच्या कामाकरीता तक्रारदार यांना ५,०००/— रूपयांची लाच मागणी केली. परंतु तक्रारदारास शैलेंद्र बगाटे यांनी मागणी केलेली लाच रक्कम द्यायची नसल्याने तक्रारदार यांनी दिनांक १७/१२/२०२५ रोजी अॅन्टी करप्शन ब्युरो कार्यालय अकोला येथे रितसर तक्रार नोंदविली.

तक्रारदार यांच्या तक्रारीच्या अनुषंगाने दिनांक १७/१२/२०२५ रोजी शासकीय पंचासमक्ष जिल्हा परीषद, अकोला येथील समाज कल्याण विभाग येथे लाच मागणी पडताळणी कार्यवाही आजमाविली असता, आरोपी शैलेंद्र बगाटे यांनी तक्रारदार यांना शासनाच्या आंतरजातीय विवाह प्रोत्साहनपर अनुदान योजनेअंतर्गत ५०,०००/— रूपयाचे अर्थसहाय्य मिळुन देण्याकरीता पहिला टप्पा म्हणुन ३,०००/—_रूपयाची लाच रक्कमेची मागणी केल्याचे निष्पन्न झाले. तसेच दुसरा टप्पा २,००० रू. नंतर स्विकारण्याची तयार दर्शविली.

दिनांक १७/१२/२०२५ रोजी सापळा कार्यवाही दरम्यान पंचासमक्ष नामे शैलेंद्र तुळशीराम बगाटे यांनी लाच रक्कम स्विकारल्याने आरोपीस ताब्यात घेवुन पोलीस स्टेशन सिटी कोतवाली, जि. अकोला येथे भ्रष्टाचार प्रतिबंधक अधिनियम १९८८च्या कलमन्वये गुन्हा दाखल करण्याची प्रक्रिया सुरू आहे.

सदरची कारवाई श्री. बापू बांगर, पोलीस अधिक्षक, अॅन्टी करप्शन ब्युरो, अमरावती परिक्षेत्र अमरावती, श्री. सचिन्द्र शिंदे, अपर पोलीस अधिक्षक, अॅन्टी करप्शन ब्युरो, अमरावती परिक्षेत्र अमरावती, यांचे मार्गदर्शनाखाली श्री. मिलींदकुमार अ. बहाकर, पोलीस उप अधिक्षक, अॅन्टी करप्शन ब्युरो अकोला, श्री. प्रविण वेरूळकर पोलीस निरीक्षक, स.फौ. शुध्दोधन इंगळे, पोलीस हवा. राहुल इंगळे, डिगांबर जाधव, अविनाश पाचपोर, म.पो.हवा. अर्चना घोडेस्वार, पोअं. संदीप टाले, असलम शेख, गोपाल किरडे आणि चालक पो.अंम. सलीम खान यांनी केली आहे.

तरी सर्व नागरीकांना आवाहन करण्यात येते की, कोणत्याही शासकीय अधिकारी/कर्मचारी अथवा त्यांच्यावतीने कोणत्याही **खाजगी इसमाने** त्यांचे कोणतही शासकीय काम करून देण्यासाठी लाचेची मागणी केल्यास तात्काळ अॅन्टी करप्शन ब्युरो अकोला येथील खालील क्रमांवर संपर्क साधावा.

संपर्क :— १) मा.श्री. बापू बांगर, पोलीस अधिक्षक लाचलुचपत प्रतिबंधक विभाग, अमरावती परीक्षेत्र
मो.क्र. ९०११३२३४२६

२) मा.श्री. सचिन्द्र शिंदे, अपर पोलीस अधिक्षक लाचलुचपत प्रतिबंधक विभाग, अमरावती परीक्षेत्र
मो.क्र. ९७६४२१०४८५

३) मा.श्री. मिलींद अ. बहाकर, पोलीस उपअधिक्षक, लाचलुचपत प्रतिबंधक विभाग, अकोला
मो.क्र. ९१८५८२२६७६

पत्ता — लाचलुचपत प्रतिबंधक विभाग, अकोला जिल्हा मध्यवर्ती सहकारी बॅकेच्या पाठीमागे, डॉ. सपकाळ यांच्या दवाखान्याजवळ, सिव्हील लाईन्स, अकोला, जि. अकोला, फोन नं. ०७२४— ४२०३७०, ४१५३७० मो. क्र. ९४०३८०१०६४, टोल फ्री. क्रमाक — १०६४

( मिलींदकुमार अ. बहाकर)
पोलीस उप अधिक्षक
अॅन्टी करप्शन ब्युरो, अकोला

Dy. Superintendent of Police Anti Corruption Bureau * Akola *